|| अल्पारंभ: क्षेमकर:||

|| अल्पारंभ: क्षेमकर: ||
SWS Financial Solutions Pvt. Ltd.
Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle,
Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013

अंक : २१ वा    फेब्रुवारी २०२०

# गवाक्ष

......एक विचारमंच ! आर्थिक साक्षरतेसाठी

## ब्लू बुक : 'आर्थिक साक्षरता, जागरूकता आणि समावेशषकता' यासाठी



नमस्कार !

आपले कुटुंब आपल्यासाठी नेहमीच सर्वात महत्वाचे आणि प्रिय असते. कुटूंब ही संकल्पनाच अशी आहे की जी कर्त्या व्यक्तीस, कुटुंबासाठी संपत्ती निर्माण करण्यासाठी प्रेरित करत असते जेणे करून कुटुंबातील प्रत्येक सदस्य, त्याचे भावी आयुष्य अधिक समृद्धरित्या जगू शकेल.

असे असूनसुद्धा कुटुंबाशीच निगडीत असणारी एक लहानशी आणि बहुतांश कुटुंबप्रमुखांकडून नेहेमीच दुर्लक्षित केली जाणारी गोष्ट म्हणजे, आपल्या संपत्ती आणि मालमत्तेबाबत अचूक आणि अद्ययावत अशा नोंदी ठेवणे!! कुटुंबाशी निगडीत असणाऱ्या आर्थिक बाबींचे असे रेकॉर्डिंग क्वचितच योग्यरित्या केले जाते किंबहुना ही बाब अनावश्यक मानली जाते. आपल्या मालमत्तेचा, भविष्यातील कोणताही अनिश्चित क्षय रोखण्यासाठी, आपण कुटुंबासाठी केलेले आर्थिक नियोजन फलद्रुप होण्यासाठी, असे नोंदणीकरण आवश्यक असते. कुटुंबाच्या उत्पनाचा स्रोत असणाऱ्या व्यक्ती बाबत काही अकाली, दुर्दैवी घटना घडली तर आर्थिक बाबींबाबत असणाऱ्या अनागोंदींमुळे कुटुंबातील सदस्यांवर / उत्तराधिकाऱ्यांवर अमाप मानसिक दडपण येऊ शकते आणि कुटुंब प्रमुखाने केलेले आर्थिक नियोजन कोलमडू शकते. असे अनेक प्रसंग आपण आजूबाजूस घडताना बघतो. म्हणूनच कुटुंबातील प्रत्येक सदस्याने, आर्थिकदृष्ट्या सजग, साक्षर व्हावे यासाठी आम्ही ब्लू बुक निर्मिले आहे. ब्लू बुक ही एक सोपी, सुलभ संकल्पना आहे जिचा वापर कुटुंबाशी संबंधित असणाऱ्या सर्व आर्थिक बाबींचे नोंदणीकरण करण्यासाठी करायचा आहे. असे केल्याने एखाद्या कुटुंबाची वास्तविक, आर्थिक परिस्थिती, घरातील सर्व सदस्यांना स्पष्ट होण्यास मदत होते तसेच कुटुंबाशी संबंधित भविष्यातील कोणत्याही आर्थिक निर्णयासाठी मार्गदर्शक म्हणूनही ब्लू बूक कार्य करते. ब्लू किंवा निळा रंग हा स्थिरतेशी संबंधित आहे. हा रंग विश्वास, निष्ठा, आत्मविश्वास, बुद्धिमत्ता आणि सत्याचे प्रतीक मानला जातो. म्हणूनच या आर्थिक संकल्पनेचे नामकरण आम्ही ब्लू बुक असे केले आहे. ब्लू बुक वापरण्यामागील उद्देश्य कुटुंबातील सर्व सदस्यांना आर्थिक बाबींबाबत साक्षर, जागरूक करणे आणि कुटुंबाच्या आर्थिक प्रवासात त्यांनाही समाविष्ट करून घेणे असा आहे.

प्रत्येकाने जीवनातील भावी अनिश्चिततेसाठी तयार असले पाहिजे आणि आपल्या प्रियजनांना त्यासाठी मदतही केली पाहिजे. आणि म्हणूनच ब्लू बुक चा वापर तुम्ही नक्की प्रभावीपणे करावा !! आपली ब्लू बूक ची प्रत आजच आपण टीम SWS मधून प्राप्त करावी असे आवाहन मी करतो!

**– श्री. रघुवीर अधिकारी,**
मुख्य कार्यकारी अधिकारी.

## मृत्युपत्र – १



स्टॅम्प व्हेंडरचं सेंटर होतं. रविवारचा दिवस होता. लिव्ह ॲण्ड लायसन्स रजिस्ट्रेशन, आधार, पॅन, झेरॉक्स... अनेक कामं एकाच वेळी चालू होती. 'नोटरी' आपल्या वहीमध्ये भराभरा नोंदी करून नोटा जमवत होता. एवढ्यात आवाज आला, वयस्कर व्यक्तीचा. थोडा अस्पष्ट, थोडा हलका – 'अहो, तुमच्याकडे इच्छापत्राचा फॉरमॅट आहे का? मला इच्छापत्र बनवायचं आहे.' तो प्रश्न ऐकून मी एकदम दचकले. त्या गर्दीत एखादी तात्पुरत्या स्वरूपाची गोष्ट करण्यासाठी फॉरमॅट मागणारे भरपूर होते पण 'इच्छापत्र' ही 'फॉरमॅट' मध्ये करण्यासाठी गोष्ट वाटू शकते अशी कधी कल्पनासुद्धा केली नव्हती.

मन शांत झाल्यावर सगळी परिस्थिती नीट डोळ्यापुढे आली. एकटे तर कधी दुकटे असणारे माझे ज्येष्ठ सल्ला तरी कोणाला विचारणार? खात्री वाटेल अशी व्यक्ती आजकाल दुर्मीळ, माहिती अपुरी, इच्छापत्र करण्याची वेळ आली या विचाराने कातर झालेली मन:स्थिती, अशा वेळी कदाचित काहीशा अपरिहार्यपणे असं 'नोटरी' कडे जाणं होत असेल.

म्हणून मग ठरवलं, 'आनंदस्वर' च्या माध्यमातून आयुष्याची भैरवी म्हणायची तयारी कशी करावी याचा तरी विचार मांडावा.

आणखी एक, 'इच्छापत्र' हे मृत्यू या घटनेशी शंभर टक्के निगडित असतांना उगीचच त्याला इच्छापत्र असं ढोबळ नाव देण्यापेक्षा स्वच्छ 'मृत्युपत्र' असाच उल्लेख मी करणार आहे.

इच्छा पुऱ्या होतात किंवा होत नाहीत, तरीही अनेक इच्छा आपण आयुष्यभर करत राहतो. पण 'मृत्यू' अटळपणे घडणारी घटना आहे. त्याचा विचार गांभीर्यानेच करायला हवा. हे लिहिताना मला स्वच्छपणे माहित आहे की, सर्वसामान्यत: ज्येष्ठांना याबद्दल माहिती आहे पण त्याचबरोबर हेही लक्षात आलं की, त्यातही आणखी समजून घेण्यासारख्या खूप गोष्टी राहून गेल्या आहेत. याचा अनुभव खूपदा येतो. म्हणून वेगळ्या दृष्टिकोनातून हा लेख लिहीत आहे.

सर्वप्रथम विचार असा की, मृत्युपत्र केलंच पाहिजे का? यावर कायद्याचं उत्तर 'नाही केलं तरी चालतं' असं आहे. पण मृत्युपत्र न करता एखादी व्यक्ती गेली तर तिच्या संपत्तीचं वाटप कसं करायचं याबाबत भरपूर नियम, उपनियमही आहेत. त्यातले ढोबळ नियम असे की, अशा व्यक्तीचे ती व्यक्ती आहे असं धरून प्रथम भाग करायचे. उदाहरणार्थ त्या व्यक्तीला दोन मुलं आहेत असं मानलं तर एकूण चार भाग होतात. म्हणजे

२५% प्रत्येकी पत्नी आणि दोन मुलं यांना त्या व्यक्तीच्या २५% मधील १/३ म्हणजे २५% + ८.३३% = ३३.३३% इतकी संपत्ती मिळते. जर पत्नी नसेल तर ५०%, जर एक मुलगा असेल तर १००% संपत्ती त्या मुलाला मिळते. जर मुलं नसतील तर मृत व्यक्तीच्या भावाच्या मुलांना, नंतर बहिणीच्या मुलांना इत्यादी अजूनपण पुढे आणखी नियम आहेत. मात्र असे वाटे मिळताना खूप प्रक्रिया करावी लागते. (या संदर्भात स्वतंत्र लेख होऊ शकतो.) एकूण मृत्युपत्र करावंच ते योग्य.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मृत्युपत्रामध्ये काय लिहायचं असतं? सर्वप्रथम व्यक्तीच्या मालमत्तेविषयी माहिती लिहावी. मालमत्ता म्हणजे काय काय असू शकते?

१) वडिलोपार्जित. आपल्या पूर्वजांकडून वंशपरंपरेने आलेली मालमत्ता : उदा. घर, शेती, सोनं, जवाहीर इत्यादी. या मालमत्तेच्या वाटणीसाठी त्या व्यक्तीला 'हिन्दू कायदा' पाळावा लागतो. म्हणजे ती व्यक्ती स्वत:च्या मनाप्रमाणे मुलामुलींना कमी-जास्त असं वाटप करू शकत नाही. २००५ च्या सुधारणेने मुलं व मुली (विवाहित, अविवाहित दोन्ही) यांना समान वाटा द्यावाच लागतो. तसं लिहून ठेवणं कायद्याने आवश्यक असतं. जर तसं वाटप झालं नसेल, तर दावा दाखल होऊ शकतो. यामध्ये या वडिलोपार्जित मालमत्तेमधून मिळालेल्या व बँकेत अथवा रोखीमध्ये ठेवलेल्या रकमेचा जाहीर समावेश होतो. जुन्या भाड्याच्या घराचासुद्धा यात विचार केला जातो.

२) स्वकष्टार्जित मालमत्ता : व्यक्तीने स्वतंत्रपणे नोकरी, व्यवसाय स्वत:च्या जबाबदारीवर सुरू केला असेल तर या सर्वांमधून मिळणारं उत्पन्न किंवा उत्पन्नातून खरेदी केलेली कोणत्याही प्रकारातील गुंतवणूक - उदाहरणार्थ घर, फ्लॅट, बंगला, गाडी, मुदतीनुसार ठेवलेली ठेव, शेअर्स, सोनं-नाणं इ. या सार्‍याला स्वकष्टार्जित मालमत्ता असं म्हणतात.

या मालमत्तेबद्दलची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे याचं तुम्ही काहीही करू शकता, कधीही वाटणी करू शकता. देणगी रूपाने देऊ शकता. या वाटपाबद्दल न्यायालयात खटला दाखल होऊ शकत नाही,

३) तिसरा प्रकार म्हणजे तुम्ही निर्माण केलेली कोणत्याही प्रकारची संस्था, भागीदारी कंपनी किंवा या प्रत्येकातला तुमच्या वाट्याचा हिस्सा कोणाला द्यायचा याचाही निर्णय घेऊन त्याप्रमाणे उल्लेख करता येतो. अंबानी, सिंघानिया (रेमंड) यांची प्रकरणं आपल्या सर्वांनाच ज्ञात आहेत.

४) व्यक्तीने स्वत: स्थापन केलेली सार्वजनिक विश्वस्त संस्था - थोडक्यात पब्लिक ट्रस्ट यातील मालमत्ता ही ट्रस्टची असते, पण तिच्या विनियोगाचे सर्व हक्क विश्वस्तांना असतात. या संदर्भात -

या दोन कायद्यांच्या तरतुदीनुसारच निर्णय घ्यावा लागतो. याची प्रत्यक्षात वाटणी म्हणता आली नाही, तरी ट्रस्टी - विश्वस्त म्हणून केलेली नेमणूक म्हणजेच एक प्रकारे वाटणी असे त्याचे फायदे असतात.

प्रत्यक्षात खूपदा स्वत: व्यक्तीला या मालमत्ताचे प्रकार आणि त्यासाठी अस्तित्वात असणारे कायदे याचं ज्ञान नसतं त्यामुळे खूप मनस्ताप होतो, भांडणं, कोर्ट-कचेर्‍या कराव्या लागतात.

५) स्त्रीधन : स्त्रियांच्या बाबतीत महत्त्वाची असणारी ही संपत्ती, स्त्रीला विवाहाच्यावेळी मिळालेले दागदागिने, रोख रक्कम किंवा लग्नात मिळालेलं घर, गाडी इ. संपत्ती हे स्त्रीधन म्हणून ओळखलं जातं आणि स्त्री आपल्या मर्जीप्रमाणे त्याचं वाटप, विनियोग करू शकते. अनेक वेळा स्त्रियांना हे माहीत नसल्याने त्यांच्या हक्काचं साधन त्या घालवून बसतात आणि आर्थिक अडचणीला बळी पडतात.

मृत्युपत्र बनविताना वरील सर्व बाबींचा विचार व्हायला हवा.

**रोहिणी पटवर्धन, प्राचार्य एमआयटी कनिष्ठ महाविद्यालय लिखित 'आनंदस्वर ज्येष्ठांसाठी' या पुस्तकातून साभार.**

## बालदोस्तांसाठी सदर : मनो-Money
## ब्लू-बुक !



राधा आणि बाबा दोघेही कॅरम खेळता खेळता गप्पा मारत असतात.

**राधा:** बाबा, आज एक गंमत झाली ! मी या शाळेत डबा न्यायची विसरले आणि माझ्याकडे पैसे असताना देखील मी सारा कडून पैसे घेऊन कॅन्टीनमध्ये जाऊन जेवले !!

**बाबा:** अरेच्चा ! असे कसे काय झाले आज ?

**राधा:** अहो, आईने माझ्या दप्तरात इमर्जन्सी फंड म्हणून कायम पन्नास रुपये ठेवलेले असतात. पण असे पैसे ठेवल्यानंतर , आई मला ते सांगायचीच विसरून गेली बाबा !!

**बाबा:** अरे खरंच गंमत झाली की ! पण राधा पैशांच्या बाबतीत अशा चुका बरीच मोठी मंडळीही करत असतात बर का !

**राधा:** ते हो कसे काय बाबा ?

**बाबा:** अगं, बर्‍याच घरांमध्ये कुटुंबासाठी घेतलेले आर्थिक निर्णय, केलेली गुंतवणूक किंवा बचत ही कुटुंबातील सदस्यांना सांगितलीच जात नाही आणि मग अडचणीच्या काळामध्ये, कर्त्या व्यक्तीच्या अभावी, पैसे असूनही, कुटुंबीयांना त्याचा योग्य प्रकारे लाभ घेता येत नाही.

**राधा:** खरेच हो बाबा, आज आईने माझ्याचसाठी पैसे ठेवलेले असताना देखील मला केवळ माहिती न दिल्याने ते मला वापरता आले नाही.

**बाबा:** राधा, अगं ही किरकोळ रक्कमेबाबतची गोष्ट आई विसरली तर ठीक आहे. परंतु बर्‍याच घरांमध्ये सगळ्यांसाठी घेतलेले आर्थिक निर्णयही घरात शेअर होत नाहीत.परिणामतः कुटुंबातील सदस्यांना घरातील आर्थिक चित्राची जाणीवच होत नाही. आपल्या शिंदे काकांच्या घरातीलच किस्सा बघ ना ! काकांनी घरासाठी, मुलांसाठी, काकुंसाठी, आजी - आजोबांसाठी देखील वेगवेगळ्या प्रकारे पैसा जमेस ठेवला होता. परंतु त्यांच्या आकस्मिक निधनानंतर मात्र असा पैसा त्यांच्या कुटुंबियांनाच माहीत होण्यास किती अडचणी आल्या.

**राधा:** मग तर घरातील प्रत्येक कर्त्या-कमवित्या व्यक्तींनी आपले आर्थिक निर्णय, कुटुंबियांना वेळीच कळविले पाहिजेत.

**बाबा:** अग घरातील अशा आर्थिक निर्णयांचा लेखाजोखा असणारे पुस्तक किंवा नोंदवहीस आम्ही ब्लू-बुक म्हणतो. यात कुटुंबासंबंधित असलेल्या सर्व आर्थिक नोंदी केलेल्या असतात. म्हणजे घरातील सर्व बचत खाती, गुंतवणूक, विमा, स्थावर मालमत्ता, आयकर, दिलेली आणि घेतलेली कर्जे अशासंबंधी सर्व माहिती या ब्लू-बुक मध्ये नोंद केलेली असावी. तसेच हे ब्लू-बुक कर्त्या व्यक्तीने घरातील सर्वांनी दाखवायला, समजवायला हवे. म्हणजे मग अडचणीतल्या काळात, दुर्दैवी घटनेच्या वेळी, कुटुंबाला आपल्यासाठी असणारी आर्थिक सुविधा लक्षात येते. आणि केलेल्या बचत, विमा, गुंतवणुकीचा त्यांना विना-अडचण लाभ घेता येतो.

**राधा:** बाबा, खरंच किती महत्त्वाचे आहे हे ब्लू-बुक !

**बाबा:** हो अशा नोंदी ठेवणे किवा करणे हे आर्थिक साक्षर असल्याचे प्रतीक आहे.

**राधा:** मला तर फारच आवडली ही सुज्ञता ! ब्लू-बुकमुळे घरातील सगळ्यांनाच आपल्या आर्थिक परिस्थितीचे नेमके ज्ञान होते. आपल्यासाठी घरातील व्यक्ती किती करतात याची जाणीव असणे, ही सुरक्षिततेची भावना वाढवणारी बाब आहे बाबा !!

**बाबा:** बरोबर राधा! चल, मी ही तुला आपल्या घरासाठी बनविलेले ब्लू-बुक आजच समजावून सांगतो!

नंतर बाबा आणि राधा , त्यांच्या घरासाठी तयार केलेल्या ब्लू-बुक चे एकत्रित वाचन करतात.

**डॉ. सौ. रुपाली कुलकर्णी,** ट्रेनिंग हेड




विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी बजाविणाऱ्या,
टीम एस.डब्ल्यु.एस. मधील सदस्यांचा,
पद्मश्री पं. सुरेशदादा तळवलकर यांचे हस्ते सत्कार




अल्पारंभा एज्युकेशन अँड कल्चर फाऊंडेशन संचलित,
"स्वानंदी ज्ञान मंदिर" या प्राथमिक शाळेचे
हरसूल येथे उद्घाटन



नाशिक येथील एच.पी.टी. आर्टस् अँड आर.वाय.के.
सायन्स मधील 'डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिक्स' मध्ये
SWS Financial Literacy Club ची स्थापना!



श्रीमती माई लेले श्रवण विकास विद्यालय, नाशिक येथील
विद्यार्थ्यांच्या श्रवण यंत्रासाठी टीम SWS तर्फे
आर्थिक सहाय्य ! धनादेश स्वीकारतांना,
मुख्याध्यापिका सौ. वृषाली घारपुरे !

# आमच्या बद्दल, थोडेसे....

## सिंगल विंडो सर्व्हिसेस : आमचा प्रवास

आर्थिक सल्ला व गुंतवणूक क्षेत्रातील आमचा प्रवास १९९५ पासून सुरु आहे. या क्षेत्रातील सर्व सेवा, ग्राहकांना एकाच छत्राखाली उपलब्ध व्हाव्यात, या उमद्या हेतूने सिंगल विंडोचा प्रवास सुरु झाला. कंपनीचे हे पंचविसावे वर्ष सुरु आहे. सोपी, ग्राहकाभिमुख, पारदर्शी आणि विश्वासार्ह सेवा ही आमची वैशिष्टये असून आज कंपनी व्यावसायिक उत्कृष्टतेचे प्रतीक म्हणून ओळखली जाते आहे. जोडल्या गेलेल्या ग्राहकांना आर्थिक साक्षरतेकडून, आर्थिक स्वातंत्र्यापर्यंत नेण्यासाठी, आमची अनुभवसंपन्न टीम, सदैव प्रामाणिकपणे कार्यरत आहे !

## सिंगल विंडो सर्व्हिसेस: आमच्या सेवा

- ✯ आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आवश्यक असणाऱ्या गुंतवणूक सेवा ( जन्म, शिक्षण, विवाह, सेवानिवृत्ती,वारसाहक्क इ.)
- ✯ जीवन विमा, वाहन, आरोग्य आणि अपघात विमा
- ✯ करनियोजन आणि कर्ज सेवा
- ✯ व्यवसाय किंवा इतर विशिष्ट उद्देशासंदर्भात गुंतवणूक सेवा

## सिंगल विंडो सर्व्हिसेस : निवडी मागील प्रयोजने

- ✯ सेबी अधिकृत गुंतवणूक सल्लागार
- ✯ २४ वर्षांचा प्रदीर्घ, संपन्न अनुभव.
- ✯ इंजिनीअरिंग, चार्टर्ड अकौंटन्सी सारखी पार्श्वभूमी असणारी, अनुभवी आणि कार्यक्षम सल्लागारांची टीम
- ✯ विश्वासार्ह आणि नि:पक्षपाती सल्ला
- ✯ वैयक्तिक तसेच संपूर्ण कौटूम्बिक, व्यवसाय, विश्वस्थ संस्था यांना सेवा देण्याचा संपन्न अनुभव
- ✯ सोपा, ग्राहकाभिमुख,पारदर्शी आणि नैतिक व्यवहार
- ✯ पुणे, मुंबई , नागपूर, वर्धा आणि इतर उदयोन्मुख शाखा

## सिंगल विंडो सर्व्हिसेस: Vision Statement

The philosophy and vision of SWS is to bring Happiness and Peace to billions. With customer centric approach, SWS is committed to facilitate journey towards Financial Freedom by offering top class, comprehensive Financial Planning Services.


॥ अल्पारंभ: क्षेमकर: ॥

**SWS Financial Solutions Pvt. Ltd.**

Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle, Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013



**SWS Mumbai Branch**
07, Zee Usha Swapna, Mahant Road Junction,
Hanuman Cross Road, No.1,
Vile Parle (East) Mumbai 400057
**Kishor Kale : 9869239940/ 9224433122**



**SWS Pune Branch**
Office No.1, Anand Corner,Anand Park,
Wadgaonsheri, Pune - 411 014.
**Swapnil Ekande : 9028735055 / 7720099241**



**SWS Nagpur Branch**
Plot No. 30, Mandar Apartment,
Inline of Anandpurti Super Bazar,
Khamla-Jaitala Road, Nagpur - 440025.
**Neeraj Adbe : 8308833724**



**SWS Thane Branch**
14/102,Kusumba CHSL, Vasant Vihar
Pokhran Rd. No.2, Thane (west) - 400610.
**Pranav Kulkarni : 9869674831**